# कृष्णाजी केशव

प्रल्हाद जाधव

पात्रे : तो आणि ती

(कोणत्याही एखाद्या बँकेचे कार्यालय. अर्थात विंगेच्या आत. या कार्यालयातून आज नोकरीचे प्रवेशअर्ज मिळणार आहेत. त्यासाठी बाहेर रांग. रांगेत प्रथम तो. नंतर ती.  पुस्तक वाचत उभी. त्यांच्यामागे भलीमोठी रांग, अशी कल्पना.)

तो : (कार्यालय उघडले नाही म्हणून चिडून) कमाल झाली ! दहा वाजून गेले तरी ह्यांचं ऑफिस उघडत नाही अजून. अर्धा तास लेट. सालं लोकांच्या वेळेची काय किंमत आहे की नाही? उभं राहून राहून पाय दुखायला लागले. लोकांना बसण्याची व्यवस्था करावी एवढे साधे मॅनर्स नाहीत? बँक झाली म्हणून काय झालं? नोकरीचे अर्ज देणार म्हणजे काय ह्या देशातल्या बेकारांवर उपकार करणार नाही तुम्ही ! अकरा वाजता उघडायचं होतं ऑफीस तर मग जाहिरातीत दहाची वेळ कशाला टाकली?

(एक मुलगी बाजूला पुस्तक वाचत उभी आहे हे त्याच्या लक्षात येते. तिचे लक्ष वेधण्याच्या उद्देशाने पुढे बोलत राहतो)

: खरंतर इथं तुमच्या बँकेतली नोकरी हवी कुणाला! पण हे आमच्या आजीला कोण सांगणार? बँकेतला कॅशियर म्हणजे तिला लंडनचा हायकमिशनर वाटतो. म्हणून सकाळी सहा वाजता उठवून तिने मला फॉर्म आणण्यासाठी इथं पाठवलं. आणि इथं साडेदहा झाले तरी अजून कुणाचा पत्ता नाही. (तिच्याकडे लक्ष जातं) ओ सॉरी! माझं लक्षच नव्हतं तुमच्याकडं. माझ्या बडबडीचा तुम्हाला त्रास झाला असेल तर माफ करा, रिअली सॉरी!

ती - ओके, नो प्रॉब्लेम! (पुन्हा पुस्तक वाचू लागते.)

तो- तुम्हाला कुठंतरी बघितल्यासारखं वाटतंय.....

: काय म्हणालात?

:  तुम्हाला कुठंतरी पाहिल्यासारखं वाटतंय.

ती : पण मला नाही तसं वाटत...

तो :  तुम्हाला वाटण्याचा प्रश्न नाही, कारण 'मी' 'तुम्हाला' पाहिलंय, ‘तुम्ही’ ‘मला’ नाही!

ती : ठीक आहे, पाहिलंत तर पाहिलंत !

तो : (पुढं काय बोलायचं हे न सुचल्याने) म्हणजे त्याचं काय आहे... म्हणजे मला असं म्हणायचं होतं...

ती : कसलं काय आहे? काय म्हणायचं होतं?

तो : म्हणजे... कुणालातरी कुठंतरी बघून ठेवावं... म्हणजे असं बघितलेलं बरं असतं... म्हणजे काय ती व्यक्ती पुन्हा अशी कुठेतरी भेटली की बरं वाटतं. म्हणजे काय की तेवढाच वेळ निघून जातो.

ती : तुम्ही मला कुठं पाहिलंत?

तो : मला वाटतं मी तुम्हाला (आठवत) 'शिवाजी मंदिरला' पाहिलं असावं.

ती : नाटकात की प्रेक्षकात?

तो : मला वाटतं तुम्ही नाटक बघायला गेल्या असणार, तसं पाहिलं तर, म्हणजे तुमच्याकडे 'तसं पाहिलं’ तर कोणत्याही नाटकात तुम्हाला अगदी सहज काम मिळेल यात शंका नाही.

ती : तुम्ही नाटकं बघता वाटतं नेहमी?

तो : हो, बहुतेक सर्व ...

ती : डोअर किपर असण्याचा तो एक फायदाच असतो.

तो : (मनाला लावून न घेता ) छे.... तुम्ही समजता तसा मी डोअर किपर वगैरे नाही. तिकीट काढून नाटक बघायचं हे तत्त्व आहे माझं, व्यसन म्हणा ना! आणि नाटकांचा हा छंद लपवून ठेवू शकत नाही मी कधी!

ती : ते दिसतंय की!

तो : थँक्यू, तुम्ही कोणतं नाटक बघायला गेला होतात त्या दिवशी ?

ती: तुमचा काहीतरी गैरसमज झाला. मला नाटकं बघायला आवडत नाहीत आणि मुख्य म्हणजे गेल्या कित्येक महिन्यात मी शिवाजी मंदिरला गेलेली नाही...

तो : मग मला वाटतं 'ती' तुमची बहीण असावी.

ती : मला बहीण नाही...

ती : आणि–

तो : भाऊसुद्धा नाही.

तो : वडील करतात काय तुमचे?

ती : फालतू विनोद करू नका!

तो : आय मीन ‘वडील काय करतात तुमचे’ असं विचारायचं होतं मला...

ती : आणि तुम्हाला जर वेळच घालवायचा असेल तर दुसरा काहीतरी मार्ग शोधा. उगाच माझं डोकं फिरवू नका.

तो : राग आला असेल तर आय ॲम सॉरी! खरं म्हणजे तुम्हाला राग यायला नको होता. तुम्ही मला डोअर किपर म्हणालात तेव्हा मी रागावलो का तुमच्यावर ? आणि वेळ घालवण्यासाठी तुम्ही म्हणता त्याप्रमाणे दुसरा काहीतरी मार्ग शोधायचा म्हणजे माझा इथला हा पहिला नंबर जाणार. आणि मग पुन्हा किती लांब जावं लागेल माहीत आहे ना? ती बघा लाईन किती लागलेय ती... आणि आज हा फॉर्म जर मिळाला नाही तर नोकरी मिळणार नाही, नोकरी मिळाली नाहीतर समाजात प्रतिष्ठा वगैरे मिळणार नाही. त्यात ही बँकेतली नोकरी असल्यामुळे प्रतिष्ठा थोडी अधिकच, काय?

ती :(निर्विकार)

तो : (आपल्याच तंद्रीत पुढे बोलत आहे) आमच्या आजीनं तर मला बजावून सांगितलंय की, 'बँकेशिवाय दुसरी कोणतीही नोकरी करायची नाही. कारण काय म्हणाल तर तिला सतत असं वाटत असतं की, बँकेत काम करणारा माणूस कायम पैसे मोजत बसलेला असतो. (मोठ्यानं हसतो पण तिच्या चेहेऱ्यावरची रेषाही हलत नाही. त्यामुळे थोडा अपसेट झालेला. कार्यालयाकडे पहात जोरात....) अरे हे ऑफिस आहे की धर्मशाळा ? साडेदहा वाजून गेले तरी अजून कुणाचा पत्ता नाही. (तिच्याकडे पहात) कसं होणार या देशाचं कुणास ठाऊक? (एकदम मूड बदलत) अरे हां आठवलं मी तुम्हाला मंगळवारी प्रभादेवीला सिद्धिविनायकाच्या रांगेत बघितलंय...

ती : तुम्ही जरा तोंड बंद कराल का ?

तो : माफ करा पण स्वभावाचा दोष... पण प्लीज ट्राय टू अंडरस्टँड मी ! म्हणजे काय की, एखाद्या गोष्टीचा उलगडा झाला नाही ना की मी भयानक अस्वस्थ होतो. दुसरं काही सुचतच नाही. आता हेच बघाना तुम्हाला कुठं बघितलं हे आठवल्याशिवाय मला आता दुसरं काहीही सुचायचं नाही. म्हणून प्लीज... हेल्प मी टू हेल्प मायसेल्फ... मागे एकदा लिंकनचंसुद्धा असंच झालं होतं.

ती : ( किंचाळत) कोण ?

तो : लिंकन– लिंकन!

ती : अस्सं, अस्सं... लिंकन! म्हणजे लहानपणी तुमच्याशी गोट्यांनी खेळायचा तो...

तो : (हसत) छे... अहो असं कसं होईल? मी अमेरिकेचे सतरावे राष्ट्राध्यक्ष कैलासवासी अब्राहम लिंकन यांच्याविषयी बोलतोय. फारच बुवा विनोदी तुम्ही... मला विनोदी स्वभाव आवडला तुमचा. अगदी फारच आवडला....

ती : (नकळत गुरफटत) तुम्ही लिंकन विषयी काहीतरी म्हणत होतात.....

तो : हं, तर अब्राहम लिंकन एक दिवस असेच वकिलीच्या कामासाठी एका घोडागाडीतून दुसऱ्या एका गावी चालले होते. एका ठिकाणी रस्त्याच्या कडेला एका चिखलाच्या डबक्यात डुकराचं एक पिल्लू अडकून पडलंय आणि बाहेर येण्यासाठी धडपडतंय, हे त्यांना दिसलं. त्यांनी घोडागाडी थांबवली, ते खाली उतरले, तसंच पुढं जाऊन त्यानी चिखलाच्या डबक्यातून त्या पिल्लाला बाहेर काढलं आणि रस्त्यावर ठेवलं. ते तुरुतुरु पळत निघून गेलं आणि लिंकन यांनी जणू सुटकेचा निःश्वास सोडला...

ती : मग ?

तो : हा प्रकार पाहणाऱ्या लोकांनी त्यांना विचारलं की तुम्ही हे असं का केलंत? तेव्हा लिंकन काय म्हणाले असतील ?

: काय?

: ते म्हणाले, त्या पिल्लाला तशा त्रासदायक अवस्थेत तसंच सोडून मी पुढे निघून गेला असतो तर मला दिवसभर मला ते दृश्य आठवून अतिशय त्रास झाला असता. त्या मोठ्या त्रासातून सुटण्यासाठी पिल्लाला बाहेर काढण्याचा छोटासा त्रास मी पत्करला.

ती : आय सी !

तो : तात्पर्य हे की, एखाद्या किरकोळ गोष्टीची रुखरुखही मनाला कमालीची त्रासदायक ठरू शकते. आता मी तुम्हाला कुठं पाहिलं याचं उत्तर जर मला सापडलं नाही, तर तो प्रश्नही मला असाच छळत राहणार आहे. तेव्हा प्लीज... तुम्हाला तरी आठवतंय का तुम्ही मला कुठं दिसलात ते ?

ती : कमाल आहे, मी तुम्हाला कुठं दिसले ते मीच कसं काय सांगणार?

तो:आठवलं... मी तुम्हाला प्रभादेवीला सिद्धीविनायकाच्या रांगेत बघितलंय.

ती : तुम्ही तिथं कशाला गेला होतात ?

तो :मी तिथं आपला... ते हे... हे म्हणजे दर्शन- दर्शनासाठी गेलो होतो,.

ती : दर्शनासाठी ? कुणाच्या ?

तो : (हसत) फारच विनोदी बुवा तुम्ही. तिथं दुसरं कुणाच्या दर्शनाला जाणार ? आपल्याला आवडलात बुवा तुम्ही...

ती : विषय बदलू नका. मी सिद्धीविनायकाला कधीही जात नाही. इतकंच काय पण मी कधीही कोणत्याही देवळात जात नाही.

तो : मग शिवाजी पार्कला सकाळी दूध सेंटरवर?

ती : नाही.

तो : दुपारी रेशनच्या लायनीत?

ती : नाही.

तो : संध्याकाळी प्लाझा थिएटरला तिकिटांच्या लायनीत?

ती : नाही.

तो : पंच्याऐंशीच्या बसस्टॉपवर?

ती :  नाही.

तो : कॅटरिंग कॉलेजच्या आवारात?

ती : नाही... नाही. नाही... अहो, मी राहते ठाण्याला आणि शिवाजीपार्कला तुम्हाला दिसणारच कशी?

तो : (न डगमगता) अच्छा-अच्छा. म्हणजे मग मी तुम्हाला ठाण्यात कुठंतरी बघितलेलं असणार...

ती : काय डोकं बिकं फिरलंय का तुमचं?

तो: (हसत) ‘डोक्या’वर चांगली कोटी केली तुम्ही! फारच विनोदी बुवा तुम्ही. आपल्याला आवडला तुमचा स्वभाव.

ती : पण मला तुमचा हा असला स्वभाव आवडला नाही.

तो :  'हा असला' म्हणजे ?

ती :  'हा असला' म्हणजे घाणेरडा.

तो :  'घाणेरडा' म्हणजे ?

ती : घाणेरडा म्हणजे निर्लज्ज.

तो : 'निर्लज्ज' म्हणजे?

ती : निर्लज्ज म्हणजे लोचट आणि लोचट म्हणजे काय ते कृपा करून विचारू नका!

तो : छे... छे. लोचट म्हणजे काय, हे विचारणं हाच खरा लोचटपणा होईल आणि तो मी करणार नाही. त्याऐवजी मी तुम्हाला तुमचं नाव विचारू का? म्हणजे तुम्ही आता असं म्हणालही कदाचित की, नावात काय आहे? (मुद्दाम आठवल्यासारखे करीत) कोणी म्हटलंय बरं असं?

ती : शेक्सपिअरनं!

तो : हं, अगदी बरोबर. पण नावात काय आहे असं त्यानं जरी म्हटलं असलं तरी त्याला स्वतःला शेवटी शेक्सपिअर हे नाव होतंच की नाही? ते काही बेट्यानं सोडलं नाही. म्हणजे नावाला शेवटी महत्त्व आहेच! त्यामुळं तुम्ही आता तुमचं नाव सांगून टाका बघू!

ती : आणि नाही सांगितलं तर काय करणार तुम्ही ?

तो : तर मग मीच तुम्हाला एखादं नाव ठेवीन आणि यापुढं त्या नावानं हाक मारत जाईन तुम्हाला. बघा कोणतं आवडतं ते... विद्या, विशाखा, विभावरी? कावेरी, शरयु, असावरी? सुमा, हेमा, रीमा, निलिमा, सीमा? लता, अनिता, वनिता, सुनिता? नीता, प्रणिता, कविता, स्नेहांकिता? टीना, मीना, हसीना, लीना, रसलीना ? शालन, मालन, कांचन ? अभा, विभा, प्रभा ? लेखा, जुलखा, रेखा, सुरेखा ? सुरेखा जरा त्यातल्या त्यात बरं वाटतं नाही? त्याचा शॉर्टकटही मस्त होतो. 'सुरू', सूऽऽऽ रूऽऽऽ (लक्ष विंगेत जात) अरेच्या, ऑफिस सुरू झालं वाटतं. फॉर्म मिळवला पाहिजे पटकन. संपून गेले तर काही खरं नाही. मग माझ्या आजीला मी काय सांगू? येतो मी, अच्छा बाय बाय सुरु ! (पळत आत जातो. ती स्तंभित. अंधार.)

(पुन्हा प्रकाश. रंगमंचावर दोन खुर्च्या. एका खुर्चीवर ती हातातली फाईल चाळत बसली आहे. अर्थातच ती त्या बँकेच्या परिक्षेत पास होऊन इंटरव्ह्यूसाठी आलेली आहे. आतल्या खोलीत म्हणजेच विंगेत इंटरव्ह्यू चालू आहेत अशी कल्पना. ती फाईल चाळत असते, तोच दुसऱ्या बाजूने हातात एक फाईल घेऊन तो प्रवेश करतो. तिला तिथे बघून तो खूष झालेला...)

तो : हॅऽऽलोऽऽऽ सुरू... हाऊ आर यू? मला वाटलंच होतं की इंटरव्ह्यूच्या वेळी तुझी भेट होणार. पण काय गं, रिटन टेस्टला कुठं दिसली नाहीस ती? तसं मी फारसं शोधलं नाही म्हणा तुला, कारण मुळात मीच परिक्षेसाठी लेट पोहोचलो होतो. कसा काय पास झालो कुणास ठाऊक? काल अचानक घरी पत्र ... वुई आर हॅपी टू इन्फर्म यू दॅट वगैरे वगैरे... बाय द वे, तुला कधी मिळालं पत्र ? (ती काहीही बोलत नाही. लक्ष फायलीतच.)

तो : कमाल झाली. काहीच बोलत नाहीस तू ती ?

तो : (तोंड फिरवून बसते)

ती : 'एक माणूस' रागावलं वाटतं!

ती : (वैतागून बघते)

तो : अगं अशी अनोळखी माणसासारखी काय बघतेस माझ्याकडे ? या बँकेच्या परिक्षेचे फॉर्म आणायला आलो होतो आपण तेव्हा भेट झाली होती हे आठवतंय ना तुला?

ती - आता नाही म्हणून काय फायदा? त्या वेळीही मी तुम्हाला कुठेही दिसलेली नसताना नाना युक्त्या प्रयुक्त्या करून माझ्याशी ओळख करून घेतलीत आणि आता पुन्हा तोच प्रयोग करताय... यापुढे मी तुम्हाला कुठेही दिसले तरी माझ्याशी ओळख दाखवून मला छळणे हा तुमचा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो तुम्ही मिळवणारच!

तो- अरेरे, हे ऐकून ( वर बघत ) टिळकांच्या आत्म्याला किती यातना झाल्या असतील.

ती - नाटक करू नका...

तो : माझा नाटकाचा छंद लक्षात आहे तुमच्या, थँक्यू फॉर दॅट!

ती : इथं टिळकांचा काय संबंध ?

तो : टिळकांचा काय संबंध ? टिळक ? बरी आठवण केलीस. कारण टिळकांसंबंधी मी अजून एक ओळदेखील वाचलेली नाही. समजा नेमकं त्यांच्या विषयीच जर काही विचारलं गेलं तर आमची दांडी नक्की गुल झाली. (फाईल चाळत) हं... कुठे गेले लोकमान्य टिळक? (स्वतःशी पुटपुटत) दादाभाई नवरोजी... नको. महात्मा गांधी... ३० जानेवारी १९४८ ला गेले... माहीत आहे. १४ नोव्हेंबर.... बालकदिन म्हणजेच नेहरू जयंती, हेही नको. हं...

सापडले... लो. टिळक, जन्म २३ जुलै १८५६, रत्नागिरी.   स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे हा मंत्र दिला, मृत्यू १ ऑगस्ट १९२० (उघडपणे) हं आता या म्हणावं बेट्यांनो. (तिला) तू कशी काय केलीस इंटरव्ह्यूची तयारी ?

ती : मी इंटरव्ह्यूची तयारी केली, वक्तृत्व स्पर्धेची नाही.

तो : पण समजा जनरल नॉलेजमध्ये टिळकांविषयी विचारलं तर ?

ती : ती माहिती इयत्ता पाचवीतच आपल्याला तोंडपाठ होते आणि तुम्ही ती आता करताय, मग बाकीची सगळी तयारी कधी करणार ?

तो : अरे बापरे! काय काय असतं बाकीचं सगळं ? (आत बघत) बापरे, तो इंटरव्ह्यू संपत आला वाटतं? आता काय करायचं? तू काय काय तयारी केलीस ?

ती : 'इंटर्व्ह्यू इन नटशेल' नावाचं एक पुस्तक आहे, त्यात मुलाखतीचा सगळा कानमंत्र दिलेला आहे. तुम्ही वाचलंत का ते ?

तो : ते पुस्तकच काय पण त्याचं नावही अद्याप वाचलेलं नाही. बापरे, आता कसं होणार माझं ? आणि मला जर बँकेत नोकरी मिळाली नाही तर काय होणार माझ्या त्या म्हाताऱ्या आजीचं ? ती मला घराबाहेर काढल्याशिवाय राहणार नाही. तू प्लीज  मदत करतेस का मला ?

ती : म्हणजे मी काय करू?

तो : तो आतला इंटरव्ह्यू संपेपर्यंत तू माझा एक ट्रायल इंटरव्ह्यू  घेतेस का? म्हणजे मला जरा आत्मविश्वास येईल आणि तुझीही प्रॅक्टीस होऊन जाईल थोडी... प्लीज...

ती : (क्षणभर विचार करून) ठीक आहे. तुम्ही तिकडून एन्ट्री घ्या. (खुर्च्यांची तोंडं समोरासमोर करून ठेवतात. अवसान घेत रेडी होतात. ती एका खुर्चीत रेलून बसते. तो दुसरीकडून येत–)

तो : मे आय कम इन मॅडम?

ती : कम इन्. प्लीज सीट डाऊन! (तो अंग चोरून बसतो.)

ती : अहो, असे अंग चोरून बसू नका. अस्वस्थपणाचं लक्षण आहे ते. नीट आरामशीर आणि आत्मविश्वासपूर्वक बसा!  हं नाव काय तुमचं?

तो : कृष्णाजी केशव दामले.

ती : ( किंचाळत) काय ?

तो : (शांतपणे) कृष्णाजी केशव दामले.

ती : मी तुम्हाला तुमचं नाव विचारलंय, केशवसुतांचं नाही.

तो : अहो, खरंच माझं नाव कृष्णाजी केशव दामले.

ती : हे पहा, इंटरव्ह्यूच्या ठिकाणी असला आचरटपणा केलात तर तुमची नोकरी गेली म्हणून समजा.

तो : अहो मॅडम, खरंच सांगतोय. माझं नाव कृष्णाजी केशव दामले असेच आहे. अगदी तुमच्या गळ्याची शपथ घेऊन सांगतो... (नकळत तिच्या गळ्याला हात लावतो.)

ती : (ताडकन् उठत) माझ्या अंगाला हात लावलात तुम्ही? हद्द झाली अगदी. तुमचा हा पागलपणा आधीच लक्षात आला होता माझ्या. पण तुम्ही या थराला जाल असं वाटलं नव्हतं. आता जर माझ्या खेटरांचा प्रसाद नको असेल तर ताबडतोब उठा आणि तोंड काळं करा इथून. म्हणे कृष्णाजी केशव दामले !

तो : (रडकुंडीला येत ) माझे आई, (तिच्याकडे फाईल देत ) ह्यात माझं लिव्हिंग सर्टिफिकेट आहे, त्यातलं माझं नाव बघा म्हणजे तरी तुमची खात्री पटेल की (स्वत:च्या थोबाडीत मारून घेत) माझं नाव खरंच कृष्णाजी केशव दामले. दामले, दामले !

ती : (पहात) अगंबाई, खरंच की कृष्णाजी केशव दामले. पण तुमचं हे नाव केशवसुतांच्या नावाशी इतकं विलक्षण साम्यदर्शक आहे की कोणीही त्याच्यावर विश्वासच ठेवणार नाही. प्रत्येकाला ते केशवसुतांचंच वाटेल.

तो : हो ना. अहो, कुणाचाच विश्वास बसत नाही त्यावर आणि मला अगदी विनाकारण त्रास होतो त्याचा. त्या केशवसुतांच्या बाबांना पण त्यांचं दुसरं काहीतरी नाव ठेवायला काय झालं होतं परमेश्वराला माहीत!

ती : शाब्बास! म्हणजे हा दोषही तुम्ही त्यांच्याच माथी मारताय.

तो : नाहीतर मग काय करू? या प्रकाराला कंटाळून शेवटी मी माझ्या नावाचा शॉर्टफार्म तयार केलाय. 'केके' कृष्णाजी केशवसाठी केके. कसा वाटला ?

ती : ठीक आहे मिस्टर कृष्णाजी केशव दामले.

तो : मला केके म्हणाना... प्लीज...

ती : अहो, हे तुमचं घर नाही, इंटरव्ह्यू रूम आहे. समजलं?

तो : अरे, हां हां, सॉरी! इंटरव्ह्यू! येस रेडी (नीट बसतो.)

ती : घरी कोण कोण असतं तुमच्या ?

तो : आई, वडील केशव दामले आणि आजी. बहिणीचं लग्न झालंय. (जणू रुबाब दाखवत) वडील डेप्युटी कलेक्टर आहेत.

ती : त्याचा इथं काहीही फायदा होणार नाही.

तो : मला तसं म्हणायचं नव्हतं....

ती : ठीक आहे. बी. ए. ला इकॉनॉमिक्स स्पेशल ?

तो : येस मॅडम!

ती : टेल मी समथिंग अबाउट 'माल्थस थिअरी'

तो : अं... ऊन... फ्रँकली स्पीकिंग... आय डोन्ट रिमेंबर एनीथिंग अबाउट दॅट !

ती : ओके... व्हॉट डू यू रिमेंबर अबाउट डिमिनीशिंग मार्जिनल युटीलिटी ?

तो : (गप्पच.)

ती : येत नसेल तर नाही म्हणून सांगा. प्रामाणिकपणालाही मार्क्स असतात तेथे! (तो नर्व्हस होतो.)

ती : ठीक आहे. काळा पैसा म्हणजे काय सांगा पाहू ? (तो येत नाही या अर्थी मान हलवतो.)

ती : इकॉनॉमिक्स घेऊन बी. ए. फर्स्टक्लास कसे काय पास झालात ?

तो : स्पष्ट बोलायला हरकत नाही पण पदवीचा आणि ज्ञानाचा काहीही संबंध राहिलेला नाही, असं मला वाटतं.

ती : म्हणजे तुम्ही कॉप्या केल्यात.

तो : बरोबर ओळखलंत तुम्ही. आमच्या बॅचला फक्त दोघेजण असे निघाले की, त्यांनी कॉपी केली नाही. मानलं पाहिजे अगदी त्यांना.

ती : कशाबद्दल ?

तो : कारण फक्त ते दोघेजण नापास झाले.

ती : सी धिस इज नॉट फेअर...सर्विस इन बँक इज सिरीयस मॅटर...तुम्हाला त्यात इंटरेस्ट नसेल तर यु मे गो प्लीज!

तो : सॉरी सॉरी!

ती : ओके. खेळ कोणकोणते खेळता ?

तो : सगळे खेळतो. पण कोणताही विशेष आवडत नाही.

ती : मग विशेष आवड कशात आहे?

तो : वाचन, मैत्री जुळवणं आणि नाटक.

ती : काय वाचता ?

तो : हातात येईल ते सारं वाचतो. आवडलं तर मनात साठवून ठेवतो. नाही तर सोडून देतो. “मै जिंदगी का साथ निभाता चला गया, हर फिक्र को धुवे मे उडता चला गया...”

ती : मैत्री कशी काय जुळवता ?

तो : हे सांगता येणं जरा कठीणच आहे. कारण त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतल्याशिवाय तुम्हाला ते समजणार नाही.

ती : कोणी रागवत नाही का?

तो : तुम्ही रागावलात का सांगा पाहू ? सांगा ! (ती त्याच्याकडे संमोहित झाल्यागत पहात राहते ) नाही ना?

ती : अगं बाई, तुमचा इंटरव्ह्यू घेता घेता तुम्हीच माझा घ्यायला लागलात की.. हं. आता शेवटचा प्रश्न... लोकमान्य टि–

तो : (तिला बोलूही न देता पटकन् उभे रहात) लोकमान्य टिळकांचा जन्म २३ जुलै १८५६ साली रत्नागिरी येथे झाला. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे, आणि तो मी मिळवणारच' हा मंत्र त्यांनी लोकांना दिला. एकदा गुरुजींनी त्यांना फळ्यावर 'संत' हा शब्द....

ती : ती गोष्ट मला माहीत आहे.

तो : (तंद्रीतच) मग दुसरी सांगतो. एकदा एका मुलाने वर्गात शेंगाची टरफले टाकली.

ती : झक् मारली आणि ती टाकली असं त्याला आता झालं असेल.

तो : छे... छे. उलट वर्गात शेंगांची टरफले टाकून इतकी प्रचंड लोकप्रियता मिळवणारा मुलगा जगात कोणताही नसेल. शिवाय त्याच्या या कर्तृत्वामुळे भुईमुगाच्या शेंगांनाही केवढी प्रतिष्ठा प्राप्त झाली.

ती : हे मात्र खरंय हं. मला तर बाई भुईमुगाच्या शेंगा बघितल्या की, टिळकांचीच आठवण होते. एकदा तर मी भाजीवाल्याकडे शेंगाच्याऐवजी चक्क एक किलो टिळकच मागितले होते.

तो : (हाऽऽ करून मोठ्याने हसतो. हसता हसता) आपल्याला बुवा खूप आवडलात तुम्ही आणि तुमचा इंटरव्ह्यू सुद्धा.

ती : पण 'तिथला' इंटरव्ह्यू घ्यायला मी नसणार.

तो : म्हणजे काय ?

ती : त्या इंटरव्ह्यूत तुमची नक्की दांडी उडणार.

तो : हरकत नाही. तुमच्या इंटरव्ह्यूत तर पास झालो ना ? (ती बघतच रहाते. इतक्यात 'नेक्स्ट कॅंडिटेट' असे सुचवणारी बेल टर्रकन वाजते आणि गडबडीत उठत) अरेच्या, माझा नंबर आला वाटतं, तुला आताच 'बेस्ट ऑफ लक' देऊन ठेवतो. अच्छा. बाय बाय .. सुरू... (तो झटकन् इंटसाठी निघून जातो. ती नुसती पहातच रहाते. अंधार)

(प्रकाश. आता तो रस्त्यावर आहे अशी कल्पना. समोरच्या काल्पनिक इमारतीत तिसऱ्या मजल्यावर राहणाऱ्या एका मित्राला तो खाणाखुणा करून खाली बोलावतोय. मागून एका बाजूने ती येते. हातात किरकोळ खरेदीची पिशवी.)

तो : (आधी शीळ घालतो. नंतर टाळ्या वगैरे वाजवत) चिंतू ए , चिंत्या...चिंतू ... अहो चिंत्याची आई, जरा खाली पाठवता का त्याला. काय ? घरात नाही? बाहेर गेलाय? अहो, पण मला तर त्याने याच वेळी बोलावलं होतं... ओके ओके !

ती : (त्याचा आरडा-ओरडा आणि खाणाखुणा चालू असताना ती येते. तोच आहे याची खात्री करून घेत आणि) केके, अहो केके... (त्याचं लक्ष नाही. जोरात) अहो कृष्णाजी केशव दामले...

तो : (दचकून) ब... बापरे... तू कुठं इकडं ?

ती : हाच प्रश्न मी तुम्हाला विचारणार होते...

तो : म्हणजे काय ? अगं, तू ठाण्याला राहतेस ना ?

ती : छे बुवा कोणी सांगितलं तुम्हाला ?

तो : मग त्या पहिल्या भेटीच्या वेळी लोणकढी थापच मारलीस की काय ?

ती : तेव्हा मी खोटं बोलले, सॉरी. मी इथंच शिवाजीपार्कला राहते....

तो : बरं.... काय विशेष?

ती : काही नाही, भाजी आणायला चालले होते. वाटेत तुम्ही दिसलात म्हणून हाक मारली. तुम्ही कुठं राहता ?

तो : पलीकडे दादर टी.टी.ला. रत्नाकर मतकरी राहतात ना त्यांच्या बाजूला...

ती ; अय्या, ते नाटककार रत्नाकर मतकरी?

तो : हो ना !

ती : मग रोज भेटत असतील तुम्हाला ते?

तो : तर... पण ते मला जरा टरकूनच असतात...

तो : कारण मी कृष्णाजी केशव दामले ना? (दोघेही हसतात) अरे हो, तुझं ते नोकरीचं काय झालं?

ती : मी सिलेक्ट झाले. हजर होऊन महिनासुद्धा झाला.

तो : मग पार्टी कधी देतेस? ते वनिता समाजच्यासमोर उडप्याचं हॉटेल आहे ना, 'भवानी विलास हिंदू हॉटेल' तिथे चालेल. रविवार संध्याकाळ फिक्स करूया?

ती : माझी काहीच हरकत नाही. पण तुमचं काय झालं?

तो : दुसरं काय होणारं ? तू सांगितलंस तेच ! आमची दांडी उडाली...

ती : जाऊ द्या. मनाला लावून घेऊ नका.

तो : छे... छे. मी असल्या गोष्टी कधीही मनाला लावून घेत नाही. माझं आपलं खुल्लम खुल्ला असतं...जमलं तर ठीक, नाही तर दिलं सोडून...

ती : पण मग तुमच्या त्या आजीचं काय झालं? (तो गंभीर होऊन एका बाजूला येतो. त्याच्या त्या कृतीमुळे त्याची आजी 'गेली' असा भाव निर्माण होतो. तिच्या ते लक्षात येतं आणि त्याच्याजवळ जाऊन अपराधीपणाने) आय ॲम सॉरी!

तो : (गंभीरपणे) आजी आहे अजून.

ती : हात्तिच्या ! मग चेहेरा का पाडलात असा एकाएकी ?

तो : (गंभीरपणे) बँकेत माझं सिलेक्शन झालं नाही म्हणून आजीला फार वाईट वाटलं. माझ्याविषयी फार अपेक्षा आहेत तिच्या... असं वाटलं की तिच्या समाधानासाठी का होईना पण निदान एक दिवस तरी बँकेतली नोकरी मिळावी. पण माझ्यासारख्या भणंग माणसाला कसली मिळतेय बँकेतली नोकरी ?

ती : मग त्यात एवढं अस्वस्थ व्हायला काय झालं?

तो : म्हणजे ?

ती : पुन्हा तयारीला लागा, अभ्यास करा. मी तुम्हाला मदत करते.

तो : पुन्हा? अरे बापरे! त्यापेक्षा मला दुसरी काहीतरी आयडिया केलेली बरी!

: कसली दुसरी आयडिया!

: वेळ आल्यावर सांगतो!आधी आपली पार्टी तर होऊ दे!

: ओके!

: विसरु नको!

: नाही विसरत! (दोघेही दोन दिशांना निघून जातात)

(झपकन् अंधार, पुन्हा प्रकाश... हॉटेल. एखाद्या उडत्या गाण्याची रेकॉर्ड सुरू आहे. एका कोपऱ्यात दोन खुर्च्या. तो पुढे, ती मागून येते.)

ती : कुठलं हॉटेल शोधून काढलंत हे ? शी, आणि नाव काय तर म्हणे 'भवानी विलास हिंदू हॉटेल'. ती भवानी जर चुकून कधी इथे आलीच ना तर विलास करण्याच्या ऐवजी विलाप करीत बसेल.

तो : (रुमाल काढून तिची खुर्ची झटकतो.) भवानीची काळजी करू नको. बैस आरामशीर!

ती : (सावधपणे बसत) जरा चांगलं हॉटेल...

तो : चांगल्या हॉटेलमध्ये चांगले पदार्थ कधीच मिळत नाहीत. उलट हॉटेल जितकं कळकट, तितके तिथले पदार्थ टेस्टी.

ती : चला, काहीतरीच काय सांगताय?

तो : अगं, हे माझं मत नाही. पु.लं.नी म्हटलंय असं.

ती : अय्या, पुलंनी?

तो : हो ना.

ती : मग नक्कीच असेल.

तो : अशा कळकट हॉटेलात जे तरुण-तरुणी जातात त्यांचं हमखास 'जमतं.'

ती : इश्यऽऽऽ भलतंच काहीतरी काय सांगताय ?

तो : हे सुद्धा माझं मत नाही.

ती : मग काय पुलंनी असं म्हटलंय ?

तो : अगदी बरोबर !

ती : काहीतरी थापा मारू नका. कोणत्या पुस्तकात लिहिलंय त्यांनी असं ?

तो : पुस्तकात नाही लिहिलं, मला प्रत्यक्ष भेटीत सांगितलं होतं. मागं ते बाबा आमट्यांच्या गोकुळ प्रकल्पासाठी इथं आले होते ना, तेव्हा मी भेटायला गेलो होतो त्यांना. ( थाप ठोकत) मी त्यांना म्हटलं की आता माझ्याकडे जेवल्याशिवाय जायचं नाही. पण ते काय म्हणाले माहिताय?

ती : काय म्हणाले?

तो : कृष्णाजी केशव दामलेंच्या घरी जेवायला जायचं म्हणजे मला स्वर्गातच जावं लागेल.

ती : तुम्हीपण थापाडे आणि ते पुलंपण थापाडे.

तो : का गं?

ती : मराठी कवी कधी स्वर्गात जाईल असं खरंच वाटतं का तुम्हाला ?

(दोघेही मोकळेपणाने हसतात)

ती : ( थांबून) बोला की काहीतरी !

तो : काय बोलू? मला तर काहीच सुचत नाही. आयुष्यात पहिल्यांदाच एका मुलीला घेऊन हॉटेलात आलोय. अशावेळी काय बोलायचं याचा अनुभव नाही मला.

ती : मग आता अनुभव घ्या. जे काय सुचेल ते बोला.

तो : (पहात) हवा काय मस्त पडलीय नाही ?

ती : इश्यऽऽऽ, हवापाण्याविषयी काय बोलताय अगदीच अरसिक माणसासारखं ?

तो : मग तूच एखादा विषय सुचव.

ती : जीवनाविषयी बोला, प्रेमाविषयी बोला.

तो : (एका दमात कृत्रिमपणे) जीवन म्हणजे तात्पर्य नसलेली एक निरर्थक गोष्ट असून प्रेम म्हणजे मेंदूला होणारी एक प्रकारची खरूज असते. एखाद्या माणसाला ती झाली की त्यातून तो कधीच पूर्णपणे बरा होत नाही.

ती : तुमची मतं फार टोकाची आहेत. जीवनावर माणसाचं प्रेम असायला हवं. श्रद्धा असायला हवी.टॉलस्टॉयसारखा माणूससुद्धा आपल्या रंगेल आयुष्याच्या उत्तरार्धात 'मला श्रद्धाळू कर असं म्हणत परमेश्वराची करुणा भाकत फिरत होता. 'हासडल्या तुज शिव्या तरीही तुझ्याच पाया आलो लोळत' असं मर्ढेकरांनाही म्हणावंच लागलं ना शेवटी?

तो : वाचन चांगलं आहे तुझं. पण वाचन आणि व्यवहार यात अंतर असतं.

ती : पण ते किती प्रेमाला खरूज म्हणण्याइतपत ?

तो : नाही तर काय ? लोक प्रेमाचा इतका अतिरेक करतात कधी कधी की, एखादा इयागो त्यांच्या मनाचा ताबा घेतो आणि मग ऑथेल्लोसारखी त्यांच्या आयुष्याची शोकांतिका होते, मला ते पटत नाही.

ती : म्हणजे तुमचा आक्षेप प्रेमावर नसून प्रेम करणारांवर आहे.

तो : तसंच काहीसं...

ती : पण तरीही तुम्ही प्रेमाला खरूज असं का म्हणालात?

तो : मी माझे शब्द मागे घ्यावे अशी तुझी इच्छा आहे का?

ती : त्याऐवजी प्रेम म्हणजे काय ते आपण नीट समजून घ्यायला हवं.

तो : तू देशील मला समजावून ?

ती : समजावून द्यायचं म्हणजे आपण ते 'फील' करायला शिकलं पाहिजे.

तो : म्हणजे काय?

तो : ते तसं शब्दांनी सांगता येणार नाही. कोणत्याही माध्यमातून ते पूर्णपणे व्यक्त करता येईल असं नाही.

तो : मग नीट विचार करून उद्या सांगशील ?

ती : प्रेमात उद्या नसतो आणि कालही नसतो. तिथे फक्त असतो वर्तमानकाळ. आज, आत्ता आणि आत्ताचा हा क्षण. हा क्षण ज्याला पकडता येतो त्याला प्रेमाचा अर्थ बरोबर समजतो. (असे सांगत असताना तो क्षण जणू काही आपल्या बोटाच्या चिमटीत आहे असे समजून ती त्याला जणू प्रात्यक्षिक दाखवू लागते. तो 'बघू बघू' या अर्थाने तिच्या बोटाच्या चिमटीतून तो क्षण आपल्या हातात घेऊन पाहतो. पण ती 'मी नाही देणार जा' असे दर्शवीत त्याला हुलकावणी देते. चिमूट वर करून हळूवारपणे तिच्यावर फुंकर मारते. त्याबरोबर तो क्षण आता जणू मजेत तरंगत आभाळात चालला आहे. त्याच्याकडे दोघेही भावपूर्ण नजरेने पहात राहतात.)

ती : त्या क्षणाच्या मखमली पालखीतून सुरू झाला आता एका निःशब्द प्रेमाचा प्रवास...

जे प्रेम आहे अनादी, अनंत, चिरंजीव आणि जीवन व्यापून उरणारे....
प्रेम म्हणजे रंग, पाण्यावरचा तरंग
आणि तेच प्रेम म्हणजे जणूकाही
काळजाखाली पेरलेला स्फोटक सुरुंग...
प्रेम म्हणजे मुक्तछंद, प्रेम म्हणजे आनंद
आणि प्रेम म्हणजे मातीत रुजून
पाकळीतून उडून जाणारा सुगंध...
प्रेम म्हणजे वेग, वादळी आवेग
आणि प्रेम म्हणजे काळोखाच्या आकाशावर
लखलखणारी विजेची एक नागमोडी रेघ...
प्रेम म्हणजे श्वास, मृगजळाचा भास
आणि प्रेम म्हणजे साम्राज्यांच्या विनाशाची
पुनरावृत्ती करणारा जिव्हारी इतिहास...
प्रेम म्हणजे प्रकाश, प्रचंड पोकळ अवकाश
आणि प्रेम म्हणजे तलवारीच्या धारेवरती
विश्रांती घेत पडणारा विश्वास...
प्रेम म्हणजे ताल, प्रेम म्हणजे काळ
आणि प्रेम म्हणजे भिंतीवरच्या केसाळ काळ्या
कोळ्याच्या दाढेमधली मायावी लाळ...
प्रेम म्हणजे गाणे, गात गात जगणे
आणि प्रेम म्हणजे खडकाखालून झुळझुळणारे
सुरेल सुंदर तराणे ...
प्रेम म्हणजे किणकिण नूपुर,
प्रेम म्हणजे अमर्याद महापूर
आणि प्रेम म्हणजे
श्रीकृष्णाच्या मुरलीमधला मवाळ हळवा सूर...
प्रेम म्हणजे डंख, डंखानंतरचा कलंक
आणि प्रेम म्हणजे,
लिपीच्या पिंजऱ्यात अडकलेल्या शब्दांना

फुटललेले सुकुमार पंख...

प्रेम म्हणजे अनंतकाळचा अश्राप किलबिलाट

आणि प्रेम म्हणजे

रक्ताकडून हृदयाकडे सूर्य वाहणारी

तेजस्वी पाऊलवाट...

क्षणाच्या मखमली पालखीत बसून

काळाच्या प्रवाहावर आपला ठसा

उमटवीत जाणाऱ्या हे प्रेमा,

तुझ्या दर्शनासाठी मला दृष्टी दे

तुझ्या प्रार्थनेसाठी मला शब्द दे

तुझ्या स्वागतासाठी मला शक्ती दे.

(ती बोलता बोलता गुढघे टेकून खाली बसते. जणू रडत आहे. तो क्षणभर कावराबावरा झालेला. तिच्याजवळ जाऊन)

तो : च... अरे अरे अरे ... असं रडायला काय झालं एकाएकी ? उठ, चल उठ लवकर. (तो तिला उठवतो) डोळे पूस पाहू ते. डोळे पूस म्हणतो ना ! (स्वतःचा रुमाल काढून तिचे डोळे पुसायला हात पुढे करतो. तेव्हा ती त्याचा हात धरून विचारते.)

ती : असं काय झालं रे मला एकाएकी?

तो : अगं प्रेमात पडल्यावर अशाच कविता सुचतात.

ती : तुला एक प्रश्न विचारू?

तो : विचार की.

ती : सिरीयसली उत्तर देशील?

तो : हो!

ती : केके ... (त्याच्या डोळ्यात रोखून पहात) माझ्या काळजात घरटं बांधून राहशील?

तो : अगं तुझं काळीज केवढं? मी केवढा?

(ती त्याचा हात झटकून तावातावानं हॉटेलच्या बाहेर पडते. अंधारात 'सुरूऽऽ ए... सुरूऽऽ अगं, तुला नक्की काय म्हणायचं होतं' वगैरे बडबडत जातो. )

(प्रकाश. आता दोघंही दादर चौपाटीवर. 'सागर किनारे दिल ए पुकारे' सारख्या गाण्याची रेकॉर्ड. तो पॅन्ट खालून वर फोल्ड करून, ती साडी हातांनी वर उचलून एकामागोमाग प्रवेश करतात. जणू काही दोघेही समुद्रात गुढघाभर पाण्यापर्यंत जाऊन भिजून आलेली आहेत. तिने पदरात दोनतीन मुठी शंख-शिंपले, रंगिबेरंगी दगड जमवलेले आहेत.)

ती : केके...

तो : काय गं?

ती : हे शिंपले मला जरा माझ्या पर्समध्ये ठेवायला मदत कर ना! असं कर आधी हे तुझ्या हातात घे, मी पर्स उघडते तू ते आत टाक!

तो : ओके. जशी आपली आज्ञा. (हातांची ओंजळ पुढे करतो. त्यात शिंपले ओतताना बरेचसे खाली सांडतात) अगं... अगं... असं काय करतेस लहान मुलीसारखी. नीट दे ना. ( तोवर सर्व शिंपले खाली सांडलेले असतात. मग तो तिच्याकडून पर्स घेतो आणि त्यात शिंपले भरायला सुरुवात करतो.)

ती : केके

तो : काय?

ती : समुद्रावर फिरायला किती मजा येते नाही?

तो : हो ना. मला तर समुद्र बघितला की अगदी आनंदाचं उधाण येतं. आणि तू सोबत असल्यावर तर असं वाटतं की ह्या लाटांवर झोकून द्यावं. चल जाऊ या?

ती : मला बुडून मरायचं नाही.

तो : समोर इतका अथांग निळा समुद्र, वरती मोकळं आकाश. पण तुझे जमिनीवरचे पाय मात्र काही सुटत नाहीत.

ती : कल्पनेच्या भराऱ्या मलाही मारता येतात. तुझा हातात हात असताना अंगावर वीज कोसळून मृत्यू यावा अशीही रोमॅंटिक कल्पना सुचते. 'क्षण एक पुरे प्रेमाचा, वर्षाव पडो मरणाचा...' वगैरे वगैरे....

तो : मग अडचण काय आहे?

ती : अजून धीर होत नाही.

तो : कसला धीर? हातात हात धरण्याचा? त्यात काय एवढं, हे बघ असा धरायचा.

(तो तिचा हात धरतो. त्या पहिल्यावहिल्या स्पर्शाला छान संगीत)

ती : (काही क्षणांनी हात सोडवून घेत) नको रे ! प्लीज... मुलीच्या अँगलनी तुला कधीच विचार करता येणार नाही.. तुला माहीत आहे का? परवा आपण त्या हॉटेलात बसलो होतो ना....

तो : हां–

ती : ते आमच्या समोरच्या एका पोरानं बघितलं...

तो : मग?

ती : त्यानं घरी जाऊन सांगितलं....

तो : मग?

ती : मग काय मग? आईनं मला चक्क विचारलं की कोण होता म्हणून...

तो : मग तू चक्क सांगून टाकायचं की मित्र होता म्हणून.

ती : इतकं सोपं नाही ते.

तो : हो ना, कारण तू पांढरपेशा वर्गात वाढलेली

मध्यमवर्गीय चाकोरीतील एक तरुणी असून मित्राबरोबर

हॉटेलात चहा घेणं हे तुझ्या जीवनमूल्यात बसणारं नाही....

ती : झालं... लगेच भडकलास तू?

तो : मग काय? तुझ्या त्या अभूतपूर्व धाडसाबद्दल सत्यनारायणाची पूजा घालू ?

(ती डोळ्याला रुमाल लावते. हुंदका)

तो : झालं... लगेच रडायला सुरुवात. हल्ली तुझं हे असंच होतंय... मला इथं बोलवायचं, माझ्या तोंडाची टेप सुरू करून द्यायची आणि स्वतः रडत बसायचं.

ती : मला फार त्रास होतो रे...

तो : कसला?

ती : ते तुला नाही समजायचं...

तो : मग कशाला सांगतेस?

ती : (रडवेली) किती तोडून बोलतोस रे? (पुन्हा हुंदका)

तो : (समजावत) हे बघ सुरू, तुला कसला त्रास होतो हे मला समजल्याशिवाय मी काय बोलणार?

ती : (निघत) मी जाते ....

तो : (चिडून) माझा जीव टांगणीला लावून तुला काय मिळतं?... आणि तुला काय वाटतं की, मला स्वतःला त्रास करून घेण्याचा छंद आहे, म्हणून तुझ्यासोबत येतो मी?

ती : मग कशासाठी येतोस?

तो : माझ्या त्या म्हाताऱ्या आजीसाठी!

ती : आजीसाठी?

तो : हो!

ती : अरे पण म्हणजे नक्की काय म्हणायचंय तुला?

तो : मला बँकेत नोकरी मिळाली तर नाही पण मी बँकेत नोकरी करणारी बायको तरी मिळवली पाहिजे असं सारखं सारखं मनात येतं माझ्या! (दोघेही मोकळेपणाने हसतात)

तो : तू आवडतेस मला सुरू!

ती : माझी शपथ घे!

तो : तुझी शपथ! आणि मला विनाकारण खोटं बोलायला आवडत नाही.

ती : म्हणूनच मलाही तू खूप खूप आवडतोस केके...

तो : आतातरी तुझ्या त्रासाचं कारण सांगणार ना?

ती : हेच कारण...

तो : काय? मी तुला आवडतो हे?

(ती मान होकारार्थी हलवते)

तो : अगं पण म्हणजे नक्की काय?

ती : उद्या सांगेन. संध्याकाळी सहा वाजता इथंच भेट. सहा म्हणजे सहा. अजिबात उशीर करू नको. (पळते)

तो : (तिच्या मागोमाग ओरडत) सुरू, ए सुरू... सुरू मला असं कोड्यात टाकून जाऊ नकोस.... सुरू... ए... सुरू... (पळत जातो. अंधार. पुन्हा प्रकाश. 'जिथे सागरा धरणी मिळते' सारख्या एखाद्या गाण्याची मंद रेकॉर्ड. ती त्याची वाट बघत येरझरा घालतेय घड्याळात बघतेय. रडकुंडीला येण्याच्या बेतात. अखेरीस तो आरामशीरपणे येतो.)

ती : किती उशीर केलास? वाजले किती बघ जरा घड्याळात... पावणेसात वाजले.

तो : लवकर येऊन तरी काय करणार? तुझं आपलं ते 'जाईतनं आली आणि जुईतनं गेली असं विंदा करंदीकरांच्या कवितेसारखं कोड्यात बोलणं सुरू असतं. कंटाळा आला अगदी मला....

ती : कोणाचा?

तो : विंदांच्या कवितांचा ! (काही क्षणांनी मोठ्याने हाक मारत) चनेवाला...... चनेवाला... तुला चणे हवेत का?

ती : (घुश्यात) मला नकोत तुझे चणे...

तो : (चनेवाल्याला) नही नही.. नही चाहिये.... जाव तुम.....

ती : आज हे चणे खाण्याचं खूळ कसं काय डोक्यात आलं तुझ्या ?

तो : टाईमपासला चणे मस्त असतात?

ती : इतका बोअर झालाहेस?

तो : अजून झालेलो नाही पण लवकरच होईन...

ती : आज मला तुझ्याशी काही महत्त्वाचं बोलायचंय...

तो : मग तर नक्कीच बोअर होणार मी!

ती : चेष्टा करून नकोस. चल आपण त्या कठड्याला टेकून बसू...

तो : नको... तिथं गेलो की, मला तुझा मोह होतो.

ती : होऊ दे...

तो : होऊ दे काय होऊ दे? परवा नुसता हात हातात घेतला तर केवढ्यानं बोंबलीस?

ती : (भांडण सुरू) बोंबलले नाही. शांतपणे सांगितलं की, हात सोड...

तो : एकूण एकच!

ती : एकच काय? तू काय म्हणालास आठवतंय तुला?

तो : मला नव्हतं माहीत की इतकं आभाळ कोसळेल तुझ्यावर. मी फक्त इतकंच म्हटलं की, सुरू, एखादा क्षण तरी परस्परात विरघळून जाऊ या आपण!

ती : पण मला नाही आवडत तसलं...

तो : मलाही नाही गप्प बसणं शक्य होत...

ती : मग तू तुझ्या स्वभावाला जरा मुरड घाल !

तो : आणि तू घातलीस तर काय होईल? पण नाही... तू एक आदर्श भारतीय नारी ना ?

(ती रडायला लागते.तो अधिकच अस्वस्थ.)

तो : सुरू यातून काहीही निष्पन्न होणार नाही. तू तुझ्या भूमिकेवर अडून आहेस. मी माझ्या... नो साईन्स ऑफ कॉम्प्रमाइज! आता हे कुठंतरी थांबवायला हवं!

ती : तुला थांबवायचं असेल तर खुशाल थांबव.

तो : मला थांबवायचं नाही...

ती : आणि मलाही थांबवायचं नाही...

तो : मग आपण भांडतोय कशाला?

ती : मूर्ख आहोत म्हणून!

तो : मग शहाणी माणसं अशावेळी काय करतात?

ती : काय करतात?

तो : (प्रेक्षकांना) शहाणी माणसं अशावेळी काय करतात हो?

('लग्न' असं उत्तर प्रेक्षकांकडून अपेक्षित आहे. ते न आल्यास विंगेतून 'अरे लग्न लग्न!' असा आवाज येतो. ती दोघेही हसत एकमेकांचे हात हातात घेतात आणि गोलाकार फिरू लागतात. सनई वाजायला लागते आणि त्याच हळूवारपणे पडदा पडत जातो.)

***

सूचना : या एकांकिकेचे सर्व हक्क लेखकाकडे राखीव आहेत. तिचे प्रयोग करण्यापूर्वी लेखकाची परवानगी घेणे बंधनकारक आहे. तिचे भाषांतर, रूपांतर, त्यावर आधारित चित्रपट, चित्रमालिका, त्याचे अभिवाचन, यूट्युब-फेसबुकवरील किंवा अशाच प्रकारच्या विद्यमान अथवा भविष्यात येऊ घातलेल्या माध्यमातून पूर्ण, अंशतः किंवा अशा कोणत्याही प्रकारच्या चित्रिकरण, ध्वनिमुद्रण,प्रसारणापूर्वी लेखकाची परवानगी घेणे बंधनकारक आहे. यासंदर्भात काही वाद उद्भवल्यास संबंधित कायदेशीर कारवाई मुंबईक्षेत्रात होईल याची सर्व संबंधितानी नोंद घ्यावी.

प्रल्हाद जाधव

pralhadjadhav.one@gmail.com

9920077626

***